इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम १९९६ तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अंतर्गत उपकर वसूल करण्याबाबतची कार्यपध्दती

## महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : बीसीए २००७/प्र.क्र. ७८८/कामगार ७-अ
मंत्रालय मुंबई- ३२.
दिनांक : २६ ऑक्टोबर, २००९

## परिपत्रक

इमारत व इतर बांधकाम कामगार यांचेसंदर्भात रोजगार व सेवाशर्ती तसेच त्यांची सुरक्षा, आरोग्य कल्याण विषयक व इतर संबंधित बाबींसाठी तरतूदी करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेल्या इमारत व इतर बांधकाम (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम, १९९६ या केंद्रीय अधिनियमांतील तरतुदींच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार नियम २००७ तयार केले आहेत. याच अधिनियमाच्या कलम १८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन शासनाने महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना केली आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ च्या कलम ३(१) अनुसार केंद्र शासनाने अधिसूचना क्र. एसओ २८९९, दिनांक २६ सप्टेंबर १९९६ अन्वये बांधकामाच्या एकूण मुल्याच्या (जमिनीचे मुल्य वगळून)१% दराने उपकर गोळा करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्या अनुषंगाने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ च्या तरतदींनुसार शासनाने दिनांक २४/८/२००७ व दि.१६/४/२००८च्या अधिसुचनेद्वारे उपकर वसुलीसाठी उपकर वसुली अधिकारी, निर्धारण अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती केली आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ च्या कलम ३(१) अनुसार केंद्र शासनास उपकराची टक्केवारी ठरविणेबाबतच्या असलेल्या अधिकारान्वये केंद्र शासनाच्या कामगार मंत्रालयाने अधिसूचना क्र. एसओ २८९९, दि. २६ सप्टेंबर, १९९६ अन्वये एका टक्का दराने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर गोळा करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्या अनुषंगाने राज्यामध्ये एका टक्का उपकर बांधकामाच्या एकूण मुल्यानुसार (जमिनीचे मुल्य वगळून) दि. १ जानेवारी, २००८ पासून राज्यातील इमारत व इतर बांधकाम नियोक्ताकडून संबंधित उपकर वसूली अधिकारी यांनी मूळ स्त्रोतातूनच उपकर वसूली करण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना परिपत्रक क्र.बीसीए १२००७/प्र.क्र.७८८/का.७, दिनांक २१ एप्रिल,२००८ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम १९९६ च्या कलम २ (१) (डी) मध्ये इमारत व इतर बांधकामाची व्याख्या करण्यात आली असून कलम २ (१)(ई) मध्ये बांधकाम कामगाराची व्याख्या करण्यात आली आहे. तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या अधिसूचना क्रमांक एमएससी

१०९७/सीआर १९९२/कामगार २, दि. २६ जुन, १९९७ अन्वये या अधिसूचनेच्या अनूसूचीच्या स्तंभ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींची **"नोंदणी अधिकारी"** म्हणून या अधिसूचनेच्या स्तंभ ३ मध्ये त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या क्षेत्राच्या हद्दीकरीता नियुक्ती केली आहे.

राज्यातील इमारत व इतर बांधकामाची, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवेच्या शर्ती) अधिनियम १९९६ च्या तरतुदी नुसार नोंदणी व्हावी आणि बांधकामाच्या एकूण मूल्याच्या एक टक्का उपकर परिपत्रक क्र.बीसीए १२००७/प्र.क्र.७८८/का.७, दिनांक २१ एप्रिल,२००८ अन्वये दि.१ जानेवारी २००८ पासून वसूल करुन ती रक्कम इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे जमा करण्याच्या प्रक्रियेमध्ये सुसूत्रता यावी व कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी पुढिल प्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

अ) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या अधिसूचना क्र. बीसीए २००८ /प्र. क्र. ९०७ /का-७, दिनांक १६ एप्रिल, २००८ च्या रकाना क्रमांक २ मध्ये दर्शविलेल्या आस्थापना जसे शासकीय व इतर बांधकाम करणाऱ्या आस्थापना, सार्वजनिक उपक्रमाच्या इमारत व इतर बांधकामाशी संबंधित असलेल्या आस्थापना, तसेच महानगरपालिका,नगरपरिषदा, ग्रामपंचायती इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच या व्यतिरिक्त असलेल्या इतर कोणत्याही बांधकाम करणाऱ्या आस्थापना यांनी त्याच्याशी संबंधित "नोंदणी अधिकारी" यांच्याकडे इमारत व इतर बांधकाम कामगार ( रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम १९९६ च्या कलम ७ नुसार नोंदणी करावी. नियोक्त्याने अशी नोंदणी न केल्यास त्याला इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) अधिनियम १९९६ च्या कलम १० नुसार कामगारांची नियुक्ती करता येणार नाही अशी तरतूद आहे. तसेच या अधिनियमांच्या कलम ५० नुसार, या अधिनियमातील तरतुदींचा भंग केल्यास रु. १०००/- इतका दंड आणि तरतुदींचे पालन करेपर्यंत प्रत्येक दिवसाकरीता रु. १००/- इतक्या दंडाची तरतुद आहे. तसेच बांधकामासंबंधी कलम ४६ नुसारची सूचना मालकाने न दिल्यास ३ महिन्यापर्यंत कैद आणि किंवा रु. २०००/- पर्यंत दंड अशी तरतूद कलम ४८ मध्ये आहे. सर्व संबंधित विभागांनी, सर्व संबंधितांविरुध्द योग्य ती दंडनीय कार्यवाही करुन अधिनियमातील तरतूदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी.

(ब) सर्व संबंधित विभाग, शासकीय / निमशासकीय उपक्रम यांनी बांधकामास परवानगी देण्याच्या प्रत्येक प्रकरणास एक युनिक क्रमांक द्यावा, आणि हा क्रमांक बांधकाम सुरु करण्याच्या प्रमाणपत्रामध्ये नमूद करावा. इमारत व इतर बांधकाम उपकरासंबंधीचा युनिक कोड अभावी बांधकाम सुरु करण्याचे प्रमाणपत्र अपूर्ण असल्याचे मानण्यात यावे. तसेच बांधकामाची सुरुवात करण्यापूर्वी वसुल करण्यात आलेला उपकर आगाऊ स्वरुपात इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या निधीमध्ये जमा करावा.

(क) इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकराची रक्कम सर्व संबंधितांना धनाकर्षाद्वारे, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे जमा करावयाची आहे. त्याकरिता देय होणाऱ्या उपकराची रक्कम धनाकर्षाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ या नावे, मंडळ खाते क्र.००४२२०११००००१५३ बँक ऑफ इंडीया, मध्ये उपकराची रक्कम प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३०

दिवसांच्या आत जमा करावी. तसेच अशाप्रकारे वसूल केलेला उपकरा संबंधिचा तपशील अध्यक्ष, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई ४०० ०३४ यांच्याकडे पाठवावा. या धनाकर्षाची एक झेरॉक्स प्रत काढून संबंधित क्षेत्राच्या नोंदणी अधिकारी यांच्याकडेही पाठवावी.

(ड) सर्व उपकर निर्धारण अधिकाऱ्यांनी उपकर वसूलीच्या प्रक्रियेमध्ये सुसूत्रता यावी या दृष्टीने प्रत्येक प्रकरणास एक युनिक क्रमांक द्यावा. बांधकाम सुरु करण्याचे आदेश (Permission) किंवा अनुज्ञप्ती यामध्ये हा युनिक क्रमांक देणे आवश्यक असेल. प्रत्येक प्रकरणात द्यावयाचा हा युनिक क्रमांक १७ अंकी असून या युनिक क्रमांकामधील -

(अ) पहिले चार अंक वर्ष दर्शवितील,

(ब) दुसरे दोन अंक जिल्हा कोड दर्शवितील,

(क) त्यानंतरचे तीन अंक तालुका कोड दर्शवितील,

(ड) त्यानंतरचे दोन अंक निर्धारण अधिकारी याचा प्रकार दर्शवितील,

(ई) त्यापुढील चार अंक कर निर्धारण अधिकाऱ्याने दिलेला प्रकरणाचा क्रमांक दर्शवितील.

(फ) त्यापुढील दोन अंक बांधकामाचा टप्पा दर्शवीतील.(बांधकाम एका टप्प्यात पूर्ण होत असल्यास हे दोन अंक ० - ० असे असतील.)

या युनिक कोड संदर्भात वापरावयाचे जिल्हा कोड, तालुका कोड, निर्धारण अधिकारी प्रकार कोड सोबतच्या प्रपत्र अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे असतील.

**उदा. एका युनिक कोडचे उदा. खाली दिलेले आहे.**

| वर्ष कोड | | | | जिल्हा कोड | | तालुका कोड | | | निर्धारण अधिकारी कोड | | निर्धारण अधिका-यांनी दिलेला प्रकरण क्रमांक | | | | बांधकामाचा टप्पा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ० | ० | ९ | २ | ० | ० | २ | ० | ० | ४ | ४ | ० | २ | ५ | ० | १ |

या परिपत्रकामध्ये उल्लेखिलेल्या पध्दतीस उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, नगरविकास विभाग, गृह निर्माण विभाग, ग्राम विकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागच जलसंपदा विभाग यांची मान्यता घेऊन ते दिनांक १ नोव्हेंबर २००९ पासून अंमलात आणण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(कविता गुप्ता)
सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग

प्रत-

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,

अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई.

(मंत्रालयीन सर्व विभागांकडून हा शासन निर्णय त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व सार्वजनिक उपक्रमांच्या निदर्शनास आणण्यात यावा.)

मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा,
सर्व नोंदणी अधिकारी,
कक्ष अधिकारी (प्रशासन-२) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांना सदर शासन निर्णय वेबसाईटवर टाकण्याच्या विनंतीसह अग्रेषित.

## प्रपत्र-अ

## युनिक कोड संदर्भात वापरावयाचे जिल्हा कोड, तालुका कोड, निर्धारण अधिकारी कोड.

| युनिक कोड संदर्भात वापरावयाचे जिल्हा कोड | | |
|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | जिल्हाचा कोड |
| १ | मुंबई | ०१ |
| २ | ठाणे | ०२ |
| ३ | रायगड | ०३ |
| ४ | रत्नागिरी | ०४ |
| ५ | सिंधुदुर्ग | ०५ |
| ६ | नाशिक | ०६ |
| ७ | धुळे | ०७ |
| ८ | नंदूरबार | ०८ |
| ९ | जळगांव | ०९ |
| १० | अहमदनगर | १० |
| ११ | पुणे | ११ |
| १२ | सातारा | १२ |
| १३ | सांगली | १३ |
| १४ | सोलापूर | १४ |
| १५ | कोल्हापूर | १५ |
| १६ | औरंगाबाद | १६ |
| १७ | जालना | १७ |
| १८ | परभणी | १८ |
| १९ | हिंगोली | १९ |
| २० | बीड | २० |
| २१ | नांदेड | २१ |
| २२ | उस्मानाबाद | २२ |
| २३ | लातूर | २३ |
| २४ | अमरावती | २४ |
| २५ | अकोला | २५ |
| २६ | वाशीम | २६ |
| २७ | बुलढाणा | २७ |
| २८ | यवतमाळ | २८ |
| २९ | नागपूर | २९ |
| ३० | वर्धा | ३० |
| ३१ | भंडारा | ३१ |
| ३२ | गोंदिया | ३२ |
| ३३ | चंद्रपूर | ३३ |
| ३४ | गडचिरोली | ३४ |

## युनिक कोड संदर्भात वापरावयाचे तालुका कोड

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | तालुक्याचा कोड | | अ.क्र. | तालुक्याचेनांव | तालुक्याचा कोड |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | जिल्हा | रत्नागिरी | |
| जिल्हा | मुंबई | | | ३४ | रत्नागिरी | ०३४ |
| १ | अंधेरी | ००१ | | ३५ | गुहागर | ०३५ |
| २ | बोरीवली | ००२ | | ३६ | दापोली | ०३६ |
| ३ | कुर्ला | ००३ | | ३७ | मंडणगड | ०३७ |
| जिल्हा | ठाणे | | | ३८ | खेड | ०३८ |
| ४ | ठाणे | ००४ | | ३९ | चिपळूण | ०३९ |
| ५ | वसई | ००५ | | ४० | संगमेश्वर | ०४० |
| ६ | पालघर | ००६ | | ४१ | लांजा | ०४१ |
| ७ | डहाणू | ००७ | | ४२ | राजापूर | ०४२ |
| ८ | तलासरी | ००८ | | जिल्हा | सिंधुदुर्ग | |
| ९ | जव्हार | ००९ | | ४३ | कणकवली | ०४३ |
| १० | मोखाडा | ०१० | | ४४ | कुडाळ | ०४४ |
| ११ | वाडा | | | ४५ | सावंतवाडी | ०४५ |
| १२ | भिवंडी | ०१२ | | ४६ | दोडा मार्ग | ०४६ |
| १३ | शहापूर | ०१३ | | ४७ | वेंगुर्ले | ०४७ |
| १४ | मुरबाड | ०१४ | | ४८ | मालवण | ०४८ |
| १५ | कल्याण | ०१५ | | ४९ | देवगड | ०४९ |
| १६ | उल्हासनगर | ०१६ | | ५० | वैभववाडी | ०५० |
| १७ | विक्रमगड | ०१७ | | जिल्हा | नाशिक | |
| १८ | अंबरनाथ | ०१८ | | ५१ | नाशिक | ०५१ |
| जिल्हा | रायगड | | | ५२ | पेठ | ०५२ |
| १९ | अलिबाग | ०१९ | | ५३ | दिंडोरी | ०५३ |
| २० | उरण | ०२० | | ५४ | सुरगाणा | ०५४ |
| २१ | पनवेल | ०२१ | | ५५ | कळवण | ०५५ |
| २२ | कर्जत | ०२२ | | ५६ | बागलाण | ०५६ |
| २३ | खालापूर | ०२३ | | ५७ | मालेगांव | ०५७ |
| २४ | पेण | ०२४ | | ५८ | चांदवड | ०५८ |
| २५ | सुधागड | ०२५ | | ५९ | नांदगाव | ०५९ |
| २६ | रोहा | ०२६ | | ६० | येवले | ०६० |
| २७ | माणगांव | ०२७ | | ६१ | निफाड | ०६१ |
| २८ | तळा | ०२८ | | ६२ | सिन्नर | ०६२ |
| २९ | महाड | ०२९ | | ६३ | इगतपुरी | ०६३ |
| ३० | पोलादपूर | ०३० | | ६४ | देवळा | ०६४ |
| ३१ | म्हसळा | ०३१ | | ६५ | त्र्यंबकेश्वर | ०६५ |
| ३२ | श्रीवर्धन | ०३२ | | जिल्हा | धुळे | |
| ३३ | मुरुड | ०३३ | | ६६ | धुळे | ०६६ |

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | तालुक्याचा कोड | | अ.क्र. | तालुक्याचे नांव | तालुक्याचा कोड |
|---|---|---|---|---|---|---|
| ६७ | साक्री | ०६७ | | १०० | श्रीगोंदे | १०० |
| ६८ | शिरपूर | ०६८ | | १०१ | पारनेर | १०१ |
| ६९ | सिंदखेड | ०६९ | | १०२ | अकोले | १०२ |
| जिल्हा | नंदुरबार | | | १०३ | संगमनेर | १०३ |
| ७० | नंदुरबार | ०७० | | १०४ | कोपरगांव | १०४ |
| ७१ | नवापूर | ०७१ | | जिल्हा | पुणे | |
| ७२ | शहादा | ०७२ | | १०५ | पुणे शहर | १०५ |
| ७३ | तळोदा | ०७३ | | १०६ | हवेली | १०६ |
| ७४ | अक्राणी | ०७४ | | १०७ | खेड | १०७ |
| ७५ | अक्कलकुवा | ०७५ | | १०८ | आंबेगाव | १०८ |
| जिल्हा | जळगांव | | | १०९ | जुन्नर | १०९ |
| ७६ | जळगांव | ०७६ | | ११० | शिरुर | ११० |
| ७७ | चोपडा | ०७७ | | १११ | दौंड | १११ |
| ७८ | यावल | ०७८ | | ११२ | इंदापूर | ११२ |
| ७९ | रावेर | ०७९ | | ११३ | बारामती | ११३ |
| ८० | मुक्ताईनगर | ०८० | | ११४ | पुरंदर | ११४ |
| ८१ | भुसावळ | ०८१ | | ११५ | भोर | ११५ |
| ८२ | बोदवड | ०८२ | | ११६ | वेल्हे | ११६ |
| ८३ | जामनेर | ०८३ | | ११७ | मुळशी | ११७ |
| ८४ | पाचोरा | ०८४ | | ११८ | मावळ | ११८ |
| ८५ | चाळीसगांव | ०८५ | | जिल्हा | सातारा | |
| ८६ | भडगांव | ०८६ | | ११९ | सातारा | ११९ |
| ८७ | पारोळा | ०८७ | | १२० | वाई | १२० |
| ८८ | एरंडोल | ०८८ | | १२१ | खंडाळा | १२१ |
| ८९ | धरणगांव | ०८९ | | १२२ | कोरेगाव | १२२ |
| ९० | अंमळनेर | ०९० | | १२३ | फलटण | १२३ |
| जिल्हा | अहमदनगर | | | १२४ | माण | १२४ |
| ९१ | नगर | ०९१ | | १२५ | खटाव | १२५ |
| ९२ | राहुरी | ०९२ | | १२६ | कराड | १२६ |
| ९३ | श्रीरामपूर | ०९३ | | १२७ | पाटण | १२७ |
| ९४ | राहता | ०९४ | | १२८ | जावळी | १२८ |
| ९५ | नेवासा | ०९५ | | १२९ | महाबळेश्वर | १२९ |
| ९६ | शेवगाव | ०९६ | | जिल्हा | सांगली | |
| ९७ | पाथर्डी | ०९७ | | १३० | मिरज | १३० |
| ९८ | जामखेड | ०९८ | | १३१ | तासगाव | १३१ |
| ९९ | कर्जत | ०९९ | | १३२ | पलूस | १३२ |

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | तालुक्याचा कोड |
|---|---|---|
| १३३ | कडेगाव | १३३ |
| १३४ | खानापूर | १३४ |
| १३५ | आटपाडी | १३५ |
| १३६ | जत | १३६ |
| १३७ | कवळे महांकाळ | १३७ |
| १३८ | वाळवा | १३८ |
| १३९ | शिराळा | १३९ |
| जिल्हा | सोलापूर | |
| १४० | उत्तर सोलापूर | १४० |
| १४१ | बार्शी | १४१ |
| १४२ | अक्कलकोट | १४२ |
| १४३ | दक्षिण सोलपूर | १४३ |
| १४४ | मोहोळ | १४४ |
| १४५ | मंगळवेढे | १४५ |
| १४६ | पंढरपूर | १४६ |
| १४७ | सांगोले | १४७ |
| १४८ | माळशिरस | १४८ |
| १४९ | करमाळा | १४९ |
| १५० | माढा | १५० |
| जिल्हा | कोल्हापूर | |
| १५१ | करवीर | १५१ |
| १५२ | पन्हाळा | १५२ |
| १५३ | हातकणंगले | १५३ |
| १५४ | शिरोळ | १५४ |
| १५५ | कागल | १५५ |
| १५६ | गडहिंग्लज | १५६ |
| १५७ | चंदगड | १५७ |
| १५८ | आजरा | १५८ |
| १५९ | भुदरगड | १५९ |
| १६० | राधानगर | १६० |
| १६१ | बावडा | १६१ |
| १६२ | शाहूरवाडी | १६२ |
| जिल्हा | औरंगाबाद | |
| १६३ | औरंगाबाद | १६३ |
| १६४ | खुलदाबाद | १६४ |
| १६५ | कन्नड | १६५ |
| १६६ | सोयगांव | १६६ |
| १६७ | सिल्लोड | १६७ |
| १६८ | पैठण | १६८ |
| १६९ | गंगापूर | १६९ |
| १७० | वैजापूर | १७० |
| १७१ | फुंलब्री | १७१ |
| जिल्हा | जालना | |
| १७२ | जालना | १७२ |
| १७३ | अंबड | १७३ |
| १७४ | जाफ्राबाद | १७४ |
| १७५ | परतूर | १७५ |
| १७६ | भोकरदन | १७६ |
| १७७ | बदनापूर | १७७ |
| १७८ | धनसावंगी | १७८ |
| १७९ | मंठा | १७९ |
| जिल्हा | परभणी | |
| १८० | परभणी | १८० |
| १८१ | जिंतूर | १८१ |
| १८२ | गंगाखेड | १८२ |
| १८३ | पाथ्री | १८३ |
| १८४ | सेलू | १८४ |
| १८५ | मानवत | १८५ |
| १८६ | पालम | १८६ |
| १८७ | सोनपेठ | १८७ |
| १८८ | पूर्णा | १८८ |
| जिल्हा | हिंगोली | |
| १८९ | हिंगोली | १८९ |
| १९० | कळमनुरी | १९० |
| १९१ | बसमत | १९१ |
| १९२ | औंढा नागनाथ | १९२ |
| १९३ | सेनगाव | १९३ |
| जिल्हा | बीड | |
| १९४ | बीड | १९४ |
| १९५ | गेवराई | १९५ |
| १९६ | माजलगांव | १९६ |
| १९७ | अंबेजागाई | १९७ |

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | तालुक्याचा कोड | | अ.क्र. | तालुक्याचे नांव | तालुक्याचा कोड |
|---|---|---|---|---|---|---|
| १९८ | केज | १९८ | | २३१ | उदगीर | २३१ |
| १९९ | पाटोदा | १९९ | | २३२ | निलंगा | २३२ |
| २०० | आष्टी | २०० | | २३३ | औसा | २३३ |
| २०१ | धारुर | २०१ | | २३४ | चाकूर | २३४ |
| २०२ | परळी | २०२ | | २३५ | रेणापूर | २३५ |
| २०३ | वडवणी | २०३ | | २३६ | देवणी | २३६ |
| २०४ | शिरुर (कासार) | २०४ | | २३७ | शिरुर (अनंतरपाळ) | २३७ |
| **जिल्हा** | **नांदेड** | | | २३८ | जळकोट | २३८ |
| २०५ | नांदेड | २०५ | | **जिल्हा** | **बुलढाणा** | |
| २०६ | हदगांव | २०६ | | २३९ | चिखली | २३९ |
| २०७ | किनवट | २०७ | | २४० | देऊळगांव राजा | २४० |
| २०८ | भोकर | २०८ | | २४१ | बुलढाणा | २४१ |
| २०९ | बिलोली | २०९ | | २४२ | मलकापूर | २४२ |
| २१० | देगलूर | २१० | | २४३ | मोताळा | २४३ |
| २११ | मुखेड | २११ | | २४४ | नांदुरा | २४४ |
| २१२ | कंधार | २१२ | | २४५ | जळगांव | २४५ |
| २१३ | लोहा | २१३ | | २४६ | संग्रामपूर | २४६ |
| २१४ | अर्धापूर | २१४ | | २४७ | खामगाव | २४७ |
| २१५ | हिमायतनगर | २१५ | | २४८ | शेगांव | २४८ |
| २१६ | माहूर | २१६ | | २४९ | मेहकर | २४९ |
| २१७ | उमरी | २१७ | | २५० | सिंदखेडराजा | २५० |
| २१८ | धर्माबाद | २१८ | | २५१ | लोणार | २५१ |
| २१९ | नायगांव | २१९ | | **जिल्हा** | **अकोला** | |
| २२० | मुदखेड | २२० | | २५२ | अकोला | २५२ |
| **जिल्हा** | **उस्मानाबाद** | | | २५३ | बार्शी टाकळी | २५३ |
| २२१ | उस्मानाबाद | २२१ | | २५४ | अकोट | २५४ |
| २२२ | उमरगांव | २२२ | | २५५ | तेल्हारा | २५५ |
| २२३ | नवीन लोहारा | २२३ | | २६५ | अमरावती | २६५ |
| २२४ | तुळजापूर | २२४ | | २६६ | नांदगांव खांडेश्वर | २६६ |
| २२५ | भूम | २२५ | | २६७ | भातुकली | २६७ |
| २२६ | परांडा | २२६ | | २६८ | अचलपूर | २६८ |
| २२७ | कळंब | २२७ | | २६९ | चांदूर बाजार | २६९ |
| २२८ | बार्शी | २२८ | | २७० | मोर्शी | २७० |
| **जिल्हा** | **लातूर** | | | २७१ | वरुड | २७१ |
| २२९ | लातूर | २२९ | | २७२ | चांदूर रेल्वे | २७२ |
| २३० | अहमदपूर | २३० | | २७३ | तिवसा | २७३ |

मप-१०/६६००-१०-२००९]-८

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | तालुक्याचा कोड | | अ.क्र. | तालुक्यांचे नांव | तालुक्याचा कोड |
|---|---|---|---|---|---|---|
| २७४ | दर्यापूर | २७४ | | ३११ | रामटेक | ३११ |
| २७५ | अंजनगाव | २७५ | | ३१२ | परासिवनी | ३१२ |
| २७६ | चिखलदरा | २७६ | | ३१३ | मौदा | ३१३ |
| २७७ | धारणी | २७७ | | ३१४ | उमरेड | ३१४ |
| २७८ | धामणगांव रेल्वे | २७८ | | ३१५ | भिवापूर | ३१५ |
| जिल्हा | यवतमाळ | | | ३१६ | कुही | ३१६ |
| २७९ | यवतमाळ | २७९ | | जिल्हा | भंडारा | |
| २८० | बाभुळगाव | २८० | | ३१७ | भंडारा | ३१७ |
| २८१ | कळंब | २८१ | | ३१८ | पवनी | ३१८ |
| २८२ | केळापूर | २८२ | | ३१९ | तुमसर | ३१९ |
| २८३ | राळेगांव | २८३ | | ३२० | मोहाडी | ३२० |
| २८४ | घाटंजी | २८४ | | ३२१ | साकोली | ३२१ |
| २८५ | वणी | २८५ | | ३२२ | लाखांदूर | ३२२ |
| २८६ | मोरेगाव | २८६ | | ३२३ | लाखनी | ३२३ |
| २८७ | पुसद | २८७ | | जिल्हा | गोंदिया | |
| २८८ | महागांव | २८८ | | ३२४ | गोंदिया | ३२४ |
| २८९ | उमरखेड | २८९ | | ३२५ | गोरेगांव | ३२५ |
| २९० | दारव्हा | २९० | | ३२६ | तिरोडा | ३२६ |
| २९१ | नेर | २९१ | | ३२७ | अर्जुनी मोरगांव | ३२७ |
| २९२ | दिग्रस | २९२ | | ३२८ | देवरी | ३२८ |
| २९३ | आर्णी | २९३ | | ३२९ | सडक अर्जुनी | ३२९ |
| २९४ | झरी-जामडी | २९४ | | ३३० | आमगांव | ३३० |
| जिल्हा | वर्धा | | | ३३१ | सालेकसा | ३३१ |
| २९५ | वर्धा | २९५ | | जिल्हा | चंद्रपूर | |
| २९६ | देवळी | २९६ | | ३३२ | चंद्रपूर | ३३२ |
| २९७ | सेलू | २९७ | | ३३३ | गोंडपिंपरी | ३३३ |
| २९८ | आर्वी | २९८ | | ३३४ | मूल | ३३४ |
| २९९ | कारंजा | २९९ | | ३३५ | सावली | ३३५ |
| ३०० | आष्टी | ३०० | | ३३६ | वरोरा | ३३६ |
| ३०१ | हिंगणघाट | ३०१ | | ३३७ | चिमूर | ३३७ |
| ३०२ | समुद्रपूर | ३०२ | | ३३८ | भद्रावती | ३३८ |
| जिल्हा | नागपूर | | | ३३९ | ब्रम्हपुरी | ३३९ |
| ३०३ | नागपूर | ३०३ | | ३४० | सिंदवाही | ३४० |
| ३०४ | नागपूर शहर | ३०४ | | ३४१ | नागभीड | ३४१ |
| ३०५ | कामठी | ३०५ | | ३४२ | राजुरा | ३४२ |
| ३०६ | हिंगणा | ३०६ | | ३४३ | कोरपना | ३४३ |
| ३०७ | काटोल | ३०७ | | ३४४ | बल्लारपुर | ३४४ |
| ३०८ | नरखेड | ३०८ | | ३४५ | पोंभुर्णा | ३४५ |
| ३०९ | सावनेर | ३०९ | | ३४६ | जिवती | ३४६ |
| ३१० | कळमेश्वर | ३१० | | | | |

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | तालुक्याचा कोड |
|---|---|---|
| जिल्हा | गडचिरोली | |
| ३४७ | गडचिरोली | ३४७ |
| ३४८ | चामोर्शी | ३४८ |
| ३४९ | धानोरा | ३४९ |
| ३५० | कुरखेडा | ३५० |
| ३५१ | आरमोरी | ३५१ |
| ३५२ | सिरोंचा | ३५२ |
| ३५३ | अहेरी | ३५३ |
| ३५४ | एटापल्ली | ३५४ |
| ३५५ | मूलचेरा | ३५५ |
| ३५६ | भामरागड | ३५६ |
| ३५७ | देसाईगंज | ३५७ |
| ३५८ | कोरची | ३५८ |

| निर्धारण अधिकारी | | |
|---|---|---|
| अ.क्र. | निर्धारण अधिकारी | निर्धारण अधिका-याचा कोड |
| १ | कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम)/कार्यकारी अभियंता (जलसंपदा) | ०१ |
| २ | सह संचालक/अतिरिक्त संचालक/महाव्यवस्थापक (संबंधित सार्वजनिक उपक्रम | ०२ |
| ३ | महानगरपालिका उप आयुक्त | ०३ |
| ४ | मुख्य अधिकारी, नगरपरिषद | ०४ |
| ५ | गट विकास अधिकारी, पंचायत समिती | ०५ |
| ६ | उप विभागीय अधिकारी | ०६ |

----------